दैनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक-संजय पवार

## हिंगोली मुख्यमंत्री रोजगार निर्मितीत राज्यात तिसरा

**मुंबई–** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करत हिंगोली जिल्ह्याने राज्यात तिसरे स्थान पटकावले आहे. जिल्ह्याने १४१ टक्के उद्दिष्टपूर्ती करत उल्लेखनीय यश मिळविल्या केल्याबद्दल राज्याचे उद्योग विभागाचे विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह यांनी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचे कौतुक करत शाबासकीची थाप दिली आहे.राज्यातील युवक-युवतींना उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देणे, स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि स्थानिक पातळीवर रोजगार वाढविणे या उद्देशाने मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम १ ऑगस्ट २०१९ पासून कार्यान्वित करण्यात आला आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे हिंगोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मितीला चालना मिळाली आहे.

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/7448 • गुरुवार दि.२३ एप्रिल २०२६ • अंक-९२ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.

# अमराठी वाहनचालकांसाठी मराठी संवाद अनिवार्य
## प्रभावी अंमलबजावणीसाठी विशेष बैठक

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील रिक्षा, टॅक्सी तसेच ओला ,ऊबर इ-बाईक टॅक्सी सारख्या इतर व्यावसायिक अमराठी वाहनचालकांनी प्रवाशांशी मराठीतून संवाद साधणे अनिवार्य करण्याच्या निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने ठोस पावले उचलली आहेत. या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ, साहित्यिक आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांसमवेत विशेष बैठक आयोजित केली आहे.

शासनाने २०१९ मध्ये घेतलेल्या निर्णयानंतरही अनेक ठिकाणी त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. विशेषतः परप्रांतीय वाहनचालकांकडून प्रवाशांशी मराठीत संवाद साधला जात नसल्यामुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे. याच पार्श्वभूमीवर हा विषय गांभीर्याने घेत राज्य शासनाने पुढाकार घेतला आहे.अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंत्रालयात पत्रकार कक्षात दिली.ज्येष्ठ पत्रकार योगेश त्रिवेदी यांना स्मार्ट कार्ड चे वाटप एसटी




महामंडळाचा शुभेच्छा दूत सिनेअभिनेते रितेश देशमुख यांच्या हस्ते देण्यात आले.त्या प्रसंगी मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली.

मराठी भाषेला नुकताच 'अभिजात भाषा' दर्जा मिळाल्याने या उपक्रमाला अधिक महत्त्व प्राप्त झाले असून, हा निर्णय केवळ प्रशासकीय न राहता अमराठी वाहनचालकांमध्ये मराठी भाषेबद्दल आत्मीयता निर्माण करणारा ठरावा, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

या उपक्रमांतर्गत अमराठी वाहनचालकांना मराठी भाषेचे प्रशिक्षण देण्यासाठी अभ्यासक्रम तयार करण्यावर भर दिला जाणार आहे. मुंबई मराठी साहित्य संघाच्या अध्यक्षा श्रीमती उज्वला मेहेंदळे तसेच ज्येष्ठ साहित्यिक प्रदीप ढवण, महेश केळुसकर, संतोष राणे, अशोक बागवे, बाळ कांदळकर, सुनील तांबे, शिवाजी गावडे, सतीश सोळांकुरकर, अरुण म्हात्रे, एकनाथ आव्हाड, प्रसाद कुलकर्णी, प्राचार्य अशोक चिटणीस, ज्येष्ठ साहित्यिका अनुपमा उजगरे, दीपा ठाणेकर आणि मनीषा राजपूत आदींच्या मार्गदर्शनामुळे या मोहिमेला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

या विषयावर सखोल चर्चा करण्यासाठी परिवहन आयुक्तही उपस्थित राहणार आहेत. उद्या, दि. २३ एप्रिल रोजी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी ११.०० वाजता ही बैठक होणार आहे. या बैठकीत मराठी भाषेची अनिवार्यता, अंमलबजावणीची रूपरेषा आणि प्रशिक्षणाचा आराखडा यावर व्यापक चर्चा होणार आहे.

वाहनचालक आणि प्रवाशांमधील संवाद सुलभ करण्यासोबतच मराठी भाषेचा सन्मान राखण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे मत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केले आहे.

# नवीन पनवेलमध्ये अतिक्रमणा विरोधातील कारवाईत भेदभावाचे आरोप; नागरिकांमध्ये संताप

**पनवेल । प्रतिनिधी**

नवीन पनवेल रेल्वे स्थानक परिसरातील सेक्टर १७ मधील मंगलमूर्ती रोज बाजार भूखंडावर बेकायदेशीर टपऱ्यांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून शहरभर कारवाई सुरू असताना या भागात मात्र भेदभाव होत असल्याचे आरोप स्थानिक नागरिकांनी केले आहेत.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित टपरीधारकांकडे महापालिकेचा कोणताही वैध व्यवसाय परवाना नसतानाही येथे मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थांची विक्री सुरू आहे. सायंकाळच्या वेळेत या टपऱ्यांचा विस्तार होत फूटपाथवरही स्टॉल्स लावले जातात. काही प्रकरणांमध्ये हे स्टॉल्स भाड्याने दिले जात असल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

फूटपाथवर अतिक्रमण झाल्यामुळे पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याशिवाय, रात्रीच्या वेळी येथील सांडपाणी व कचरा आजूबाजूच्या गटारांमध्ये टाकला जात असल्याने परिसरात अस्वच्छता वाढत आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, या टपरीधारकांवर राजकीय वरदहस्त असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होत नाही. अतिक्रमण विभागाची गाडी परिसरात आल्यावर काही वेळासाठी फूटपाथ मोकळा केला जातो, मात्र पथक निघून गेल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण केले जाते.



याशिवाय, या मार्केटमधून महापालिकेतील काही अधिकाऱ्यांना हप्ते दिले जात असल्याच्या चर्चाही स्थानिकांमध्ये सुरू आहेत. अनेक वेळा तक्रारी करूनही महापालिका प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, प्रशासन 'धृतराष्ट्राची भूमिका' घेत असल्याची तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून निष्पक्ष कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पनवेलमध्ये 'युवा शक्ती जागर' यात्रेला तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; कृष्णराज महाडिक यांचा कार्यकर्त्यांशी थेट संवाद

**पनवेल । प्रतिनिधी**

भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने आयोजित 'युवा शक्ती जागर' यात्रेच्या निमित्ताने पनवेलमध्ये तरुणाईचा महाकुंभ पाहायला मिळाला. या यात्रेचे नेतृत्व करत असलेले भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी पनवेलमधील मार्केटयार्ड येथील बैठकीत बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, नगरसेवक परेश ठाकूर आणि परिवाराच्या कार्याचा गौरव केला. ठाकूर परिवाराने प्रगत आणि पावन केलेली ही भूमी म्हणजे पनवेल आहे, अशा शब्दांत त्यांनी आपला आदर व्यक्त केला. यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना त्यांनी अतिशय नम्र भूमिका घेत सांगितले की, मी आज प्रदेशाध्यक्ष असलो तरी तुमच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून काम करणार आहे. मला तुमच्याकडूनही खूप काही शिकायचे आहे. आपण सर्वांनी मिळून युवा मोर्चाचे एक मजबूत संघटन उभे करूया. तरुणांनी विविध क्षेत्रांत काम करण्याचे धाडस दाखवले पाहिजे आणि मी तुमच्यासोबत प्रदेशाध्यक्ष म्हणून नाही, तर एक मित्र म्हणून सदैव



पाठीशी उभा राहीन. अशी ग्वाही त्यांनी दिली. मंगळवार २१ एप्रिल रोजी ही यात्रा पनवेलमध्ये दाखल झाली. यात्रेचे स्वागत गार्डन हॉटेलपासून काढण्यात आलेल्या एका भव्य बाईक रॅलीने करण्यात आले, ज्यामध्ये शेकडो तरुण उत्साहाने सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ हॉल येथे भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा विशेष संवाद मेळावा पार पडला, ज्यामध्ये आगामी काळातील संघटनात्मक बांधणीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या दौऱ्याचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे वडाळे तलाव येथे आयोजित केलेला 'मीट-अप विथ के. एम.' हा कार्यक्रम. या विशेष सत्रात कृष्णराज महाडिक यांनी तरुण पिढी आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्ससोबत थेट संवाद साधला, ज्यामुळे तरुणांमध्ये एक वेगळीच ऊर्जा पाहायला मिळाली. संपूर्ण जागर यात्रेच्या माध्यमातून युवकांना संघटित करून त्यांच्यामध्ये नवीन राजकीय आणि सामाजिक चेतना निर्माण करण्याचा प्रयत्न भारतीय जनता युवा मोर्चाकडून यशस्वीपणे करण्यात आला. या यात्रेला उत्तर रायगडमधील युवकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभल्याने पनवेलमध्ये भाजपची मोठी ताकद दिसून आली. या वेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, नगरसेवक अजय बहिरा, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, शहर उपाध्यक्ष केदार भगत, अमित ओझे, तालुका सरचिटणीस विश्वजित पाटील, रोहित जगताप, युवा मोर्च्याचे नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष मयूर कदम, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष हिमेश बहिरा, निखील जाधव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने आयोजित ‘युवाशक्ती जागर मोर्चा’या राज्यव्यापी दौऱ्याचा शुभारंभ

## राज्यातील युवकांना राष्ट्रनिर्मितीच्या ध्येयाशी जोडण्याची आणि त्यांच्या उर्जेला सकारात्मक दिशा देण्याची व्यापक मोहीम सुरू–रविंद्र चव्हाण,भाजपा प्रदेशाध्यक्ष

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने आयोजित ‘युवाशक्ती जागर मोर्चा’या राज्यव्यापी दौऱ्याचा मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतून दणक्यात शुभारंभ झाला. यामुळे राज्यातील युवकांना राष्ट्रनिर्मितीच्या ध्येयाशी जोडण्याची आणि त्यांच्या उर्जेला सकारात्मक दिशा देण्याची व्यापक मोहीम सुरू झाल्याचे उद्गार भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी काढले.

या प्रसंगी भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हे व्यासपीठावरील सर्वात युवा मनाचे आणि ऊर्जावान नेतृत्व असल्याचे नमूद केले. आपल्या मनोगतात प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी यात्रेचा उद्देश स्पष्ट करताना सांगितले की, भाजप युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने राबवण्यात



येणारा हा अशा प्रकारचा पहिलाच उपक्रम आहे. केंद्र व राज्य सरकारने तरुणाईसाठी घेतलेले लोककल्याणकारी निर्णय या यात्रेच्या माध्यमातून राज्याच्या कानाकोपऱ्यातील युवकांपर्यंत पोहोचवले जातील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अपेक्षित असलेले सक्षम आणि प्रभावी युवाशक्तीचे संघटन उभारणे, हेच या यात्रेचे मुख्य ध्येय आहे.

‘जागर युवाशक्तीचा, सशक्त राष्ट्रनिर्मितीचा’हा संदेश देणारी ही यात्रा राज्यातील युवकांना एकत्र आणत त्यांना विकास, नवकल्पना आणि राष्ट्रहिताच्या विचारांशी जोडण्याचे कार्य करणार आहे. भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या नेतृत्वात ही यात्रा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचणार असून, युवकांमध्ये जागर निर्माण करून त्यांना सामाजिक आणि राष्ट्रीय बांधिलकीची जाणीव करून देईल, असा विश्वास प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमास मंत्री जयकुमार गोरे, मंत्री अतुल सावे, मंत्री नितेश राणे, राज्यसभा खासदार धनंजय महाडिक, राज्यसभा खासदार अशोक चव्हाण, भाजपा प्रदेश सरचिटणीस व भाजयुमो प्रदेश प्रभारी सुनील राणे, मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांच्यासह इतर मान्यवर, भाजयुमोचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते.

# प्रमाणपत्र असल्याशिवाय आता व्हॉल्व्हमन पदावर नियुक्ती नाही

## अनेक व्हॉल्व्हमनचे प्रमाणपत्र बोगस याची चौकशी होणार काय

**पुणे । रमेश जयस्वाल**

पुणे महापालिकेने एक निर्णय घेतला आहे शहरातील विविध भागांत पाणी सोडण्याचे काम करणारे व्हॉल्व्हमन एकतर अधिका–यांना पैसे देऊन किंवा राजकिय आश्रमातून उदयास आलेले हे पाणी सोडणारे कर्मचारी मनाला येईल त्या प्रमाणे कारभार करत होते अनेक ठिकाणी पैसे घेऊन काम करणारे हे व्हॉल्व्हमन यांना पाणीपुरवठा करणा–या बाबतची तांत्रिक माहिती देखील नसल्या कारणाने यापुढील काळात व्हॉल्व्हमन म्हणून काम करणारे यांच्या कडे प्रमाणपत्र असलेल्यांनाचं यांचे काम देण्याचा निर्णय स्थायी समीतीने घेतला असला तरी अनेकांनी बोगस प्रमाणपत्र महापालिकेत सादर केल्या बाबत चर्चा आहे यांचे प्रमाणपत्र तपासणी करण्याची मागणी होत आहे

कोणतीही तांत्रीक बाबींचे ज्ञान नसलेले व्हॉल्व्हमनची भरती अनेक वर्षा पासून झालेली आहे एकतर हे व्हॉल्व्हमन अधिका–यांना पैसे देऊन किंवा राजकिय आश्रमातून नियुक्त केलेले आहे यांना या पाणी सोडण्या बाबत कोणतेही ज्ञान नाही पाणी सोडतांना कोणत्या विभागात किती आणि कधी पाणी सोडायचे याचा अभ्यास नसतो हे



नवशिखे व्हॉल्व्हमन सोसायट्या कडून घेऊन जास्तीचे वाढीव पाणी सोडतात याबाबत अनेक नगर सेवकांनी तक्रारी दिल्या होत्या यावर अनेक नागरिकांच्या नगरसेवका कडे तक्रारीही आलेल्या होत्या हे व्हॉल्व्हमन फक्त दोन तास कामे करतात सकाळी किंवा सायंकाळी दोन तास कामे करणारे हे व्हॉल्व्हमन दिवसभर ईतर कामे करतात यांना दोन तास कामाचे २० ते २५ हजार रूपये महिना वेतन मिळते असे असतांनाही हे व्हॉल्व्हमन अनेक भागातील नागरिक,सोसायटी,बांधकाम सूरू असलेल्या ठिकाणी ,हॉटेल यांना जास्तीचे पाणी सोडण्याचे पैसे घेत असल्याचे दृश्य आहे तर अनेक ठिकाणी अवैध नळजोड करण्या करिता या व्हॉल्व्हमन हातभार लागत असल्याचे दृश्य आहे अनेक व्हॉल्व्हमन हाताखाली कामगार ठेऊन पाणी सोडण्याचे कामे करतांना दिसत आहे जनतेच्या अनेक तक्रारी आल्या नंतर महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत या बाबत चर्चा झाली व्हॉल्व्हमन कडे प्रमाणपत्र असल्याशिवाय त्यांना कामे देण्यात येऊ नये असे स्थायी समितीच्या बैठकीत महापालिका प्रशासनाला देण्यात आले आहे अशी माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ मिळाले यांनी दिली

।।। प्रत्यक्षात व्हॉल्व्हमनचा मनमानी कारभार ,बोगस प्रमाणपत्राची चौकशी करण्याची मागणी ।।।

पुणे महापालिकेत पुर्वी व्हॉल्व्हमन म्हणून नियुक्त झालेले पाणी सोडण्यासाठी अनेकांकडून पैसे घेतात दोन तासांचे काम करणारे यांना २० ते २५ हजार रुपये पगार कसा ,यात हे व्हॉल्व्हमन स्वतः कामे न करता दूस–या कडून कामे करून घेत असल्याचा प्रकारही पुढे येत आहे महापालिकेने व्हॉल्व्हमन कडे व्हॉल्व्हमनचे प्रमाणपत्र नसेल तर यांची नियुक्ती रद्द करण्यात येणार म्हणून हे कामे करणारे व्हॉल्व्हमन बोगस प्रमाणपत्र सादर केल्या बाबत वृत्त आहे या सर्व प्रकाराची चौकशी करण्याची मागणी होत आहे अनेक ठेकेदार बोगस प्रमाणपत्र मिळवून देत असल्याचा प्रकारही पुढे येत आहे अनेक ठिकाणी पाणी सोडण्याचे काम एकाच ठेकेदाराला देण्यात येत आहे यावर उपाय म्हणून प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयानिहाल याची निविदा काढण्यात यावी आणि पुर्वी व्हॉल्व्हमन नवशिखे यांना काढण्यात यावे तसेच आता नियूक्त होणारे व्हॉल्व्हमन यांनी सादर केलेले व्हॉल्व्हमनचे प्रमाणपत्र सखोल चौकशी करण्यात यावी कारण अनेकांनी बोगस प्रमाणपत्र महापालिकेत सादर केले आहे

# उमटे धरणासाठी ५ कोटी द्या, नाहीतर आंदोलन तीव्र करू!–संघर्ष ग्रुपचा जि.प.वर थेट इशारा

**अलिबाग (ओमकार नागावकर)–** पिण्याच्या पाण्यासारख्या अत्यंत गंभीर प्रश्नावर उमटे धरण संघर्ष ग्रुप आक्रमक झाला असून, धरणातील गाळ काढण्यासाठी तात्काळ ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. वाकडीकर यांची ड. राकेश पाटील यांनी, जि.प. सदस्य डॉ. सचिन राऊळ यांच्या उपस्थितीत भेट घेतली.

यावेळी संघर्ष ग्रुपकडून सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, जिल्हा परिषदेकडे सध्या १५ व्या वित्त आयोगाचा तब्बल ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध असून, त्यापैकी केवळ ५ कोटी रुपये उमटे धरणाच्या गाळ काढण्यासाठी आणि शुद्ध पाणी पुरवठ्यासाठी देणे अजिबात कठीण नाही. तरीही प्रशासनाकडून होत असलेले दुर्लक्ष संतापजनक असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

गेल्या १२ वर्षांपासून उमटे धरण गाळाने भरत चालले असून, ३३ आदिवासी वाड्या आणि ४७ गावांतील नागरिकांना गढूळ, मातीमिश्रित पाणी पिण्याची वेळ आली आहे. सध्या चार दिवसांआड पाणीपुरवठा होत असून, तोही अशुद्ध



असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.याहून धक्कादायक बाब म्हणजे, २०२२ साली महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सुमारे २१५ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केला होता, मात्र तो आजही मंजुरीच्या प्रतीक्षेत धूळ खात पडला आहे. याशिवाय, ४.५ चडऊ क्षमतेचा जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात आला असतानाही तो मागील पाच वर्षांपासून बंद आहे. या प्रकल्पात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोपही संघर्ष ग्रुपने केला आहे.

मागील वर्षी ८ कोटी रुपयांचे टेंडर काढण्यात आले होते, मात्र तेही शासनस्तरावर रखडलेले आहे. दरम्यान, धरणातील जॅकवेल तुटलेल्या अवस्थेत असून गाळ प्रचंड प्रमाणात साचला आहे, त्यामुळे परिस्थिती अधिकच बिकट होत चालली आहे.

रायगड जिल्हा परिषदेचा यावर्षीचा अर्थसंकल्प १७५ कोटींचा आहे. त्यात ५ कोटींची तरतूद करणे काही अवघड नाही. उगाच १५–२० कोटींच्या घोषणा करून नागरिकांची दिशाभूल करण्यापेक्षा तात्काळ प्रत्यक्ष काम सुरू करावे, असा थेट टोला संघर्ष ग्रुपने लगावला आहे. उमटे धरण हे स्वतः जिल्हा परिषदेच्या मालकीचे असताना देखील अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष का, असा सवाल उपस्थित करत, पिण्याच्या पाण्यापेक्षा मोठा प्रश्न कोणता? असा संतप्त प्रश्नही निवेदनातून विचारण्यात आला आहे.दरम्यान, धरणातील गाळ तात्काळ काढून शुद्ध पाणीपुरवठा सुरळीत करावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा उमटे धरण संघर्ष ग्रुप, रायगड यांच्या वतीने देण्यात आला आहे.

# रेल्वे अपघातात दोन्ही पाय हिरावले,पण जिद्दीने मातृत्व जिंकले

## खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दिला ३.२ किलोच्या वजनाच्या निरोगी बाळाला जन्म

**पनवेल । प्रतिनिधी**

अत्यंत दुर्मीळ आणि गुंतागुतीच्या अशी गर्भधारणा असलेल्या तसेच रेल्वे अपघातात दोन्ही पाय गमावलेल्या एका डॉक्टर महिलेने मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये ३.२ किलो वजनाच्या निरोगी बाळाला जन्म दिला. प्रगत वैद्यकीय उपचार आणि तज्ज्ञांच्या टीमवर्कमुळे आई आणि बाळ दोघेही सुरक्षित आहेत.धाडस आणि अत्याधुनिक वैद्यकीय सेवेच्या एक प्रेणादायी उदाहरण ठरले आहे. प्रसूती तज्ञ डॉ. स्वप्ना दहे, स्त्रीरोग तज्ञ डॉ. अनुरंजिता पल्लवी आणि डॉ. संतोष जयभाये यांच्या टीमने, गुंतागुंतीची गर्भधारणा यशस्वीरित्या हाताळली. रुग्ण डॉ. रोशन शेख, यांनी यापूर्वी एका भीषण रेल्वे अपघातात आपले दोन्ही पाय गमावले होते. यानंतर शारीरिक आणि भावनिक आव्हानांवर मात करत त्यांनी मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये सिझेरियन शस्त्रक्रियेद्वारे ३.२ किलो वजनाच्या एका निरोगी बाळाल जन्म दिला.

डॉ. रोशन शेख यांचा मातृत्वाचा प्रवास संघर्षमय असूनही प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरत आहे. रेल्वे अपघातानंतर त्यांनी त्यांचे पुन्हा आयुष्य नव्याने उभे केले, कृत्रिम पायांच्या साहाय्याने चालु लागल्या आणि दैनंदिन आयुष्यातील कित्येक आव्हानांना धाडसाने सामोरे गेल्या. इतकंच नाही तर त्यांनी एमबीबीएस आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करत बांद्रा येथील गुरु नानक हॉस्पिटलमध्येही सेवा देण्यास सुरुवात केली. स्वतःच्या संघर्षाला त्यांनी इतरांसाठी प्रेरणादायी उदाहरण तयार केले.

डॉ. रोशन शेख म्हणाल्या, मी गर्भवती असल्याचं कळणं हा माझ्या आयुष्यातील अत्यंत भावनिक क्षण होता. अनेक संकटांनंतर मला हा दैवी आशीर्वाद वाटला आणि यामुळे माझ्या आयुष्याला नवे वळण मिळाले. मात्र त्याचवेळी आनंदसोबतच भीती आणि आत्मविश्वासाचा अभाव जाणवत होता. त्यामुळे मी माझी मैत्रीण डॉ. स्वप्ना दहे हिच्याशी संपर्क साधला आणि तिथून पुढे माझा गर्भधारणेचा प्रवास मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये सुरू झाला.



खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटल स्त्रीरोग तज्ञ डॉ. अनुरंजिता पल्लवी म्हणाल्या, हे अत्यंत गुंतागुंतीचे प्रकरण होते. रुग्णाने दोन्ही पाय गमावल्याने कृत्रिम पायांच्या आधाराने शारीरक हालचाल करणे आणि गर्भधारणेचं व्यवस्थापन करणे अधिक आव्हानात्मक होतं.

प्रसूती तज्ञ डॉ. स्वप्ना दहे म्हणाल्या, संपूर्ण गर्भावस्थेत रुग्णाने अत्यंत सकारात्मकता आणि धैर्य दाखवले. नियमित तपासणी, योग्य औषधोपचार आणि वैद्यकिय सल्ल्याचं काटेकोर पालन करण्यात आलं. ॲनेस्थेशिया तज्ज्ञ, नवजात शिशु तज्ज्ञ, न्यूरोसर्जन यांची टीम सज्ज होती. आई आणि बाळाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नियोजित सिझेरियन करण्यात आलं आणि निरोगी बाळाचा जन्म झाला. हा क्षण आमच्यासाठीही अत्यंत भावनिक होता. प्रसूतीनंतर २-३ दिवसांतच रुग्णाला हालचाल सुरू करणं शक्य झालं, त्या पुढे म्हणाल्या, आई आणि बाळ दोघांनाही चार दिवसांनंतर घरी सोडण्यात आले. विशेष म्हणजे सिझेरियननंतरही फिजिओथेरपीच्या मदतीने त्या कृत्रिम पायांच्या साहाय्याने चालू शकल्या. याचून त्यांची जिद्द आणि दांडगा आत्मविश्वास दिसून येतो.

आपला आनंद व्यक्त करताना डॉ. रोशन शेख म्हणाल्या, हा माझ्या आयुष्यातील सर्वात कठीण पण सुंदर प्रवास होता. दोन्ही पाय गमावल्यानंतर पुन्हा उभं राहणं आणि आई होणं हा प्रवास शब्दात मांडणं कठीण आहे. भीती होती, अनिश्चितता होती, पण मी आशा सोडली नाही. आज माझ्या मुलीला हातात घेतल्यानंतर हा सगळा संघर्ष सार्थकी लागल्यासारखं वाटतं.

# पनवेल तालुक्यात मनसेच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती

### नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर सर्वच स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव

**उरण । विठ्ठल ममताबादे**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष श्री राज साहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार तसेच रायगड जिल्हा संपर्क अध्यक्ष संदिप देशपांडे व योगेश परुळेकर यांच्या मार्गदर्शना नुसार संदेश भाई ठाकूर रायगड जिल्हा अध्यक्ष व सुजित सोनवणे पनवेल तालुका अध्यक्ष, अल्पेश कडु तसेच राहुल पाटील यांच्या उपस्थितीत पनवेल तालुक्यात नविन पदनियुक्त्या करण्यात आल्या. निर्दोष केशव गोंधळी पनवेल तालुका सचिव, आकाश श्रीकांत देशमुख उलवे शहर अध्यक्ष, तुषार सुनील म्हात्रे गव्हाण विभाग अध्यक्ष , अमित विनायक पाटील उलवे शहर उपाध्यक्ष, राजेश शंकर परमेश्वर उलवे शहर



सचिव , नितिन कीसन तळेकर उलवे शहर सचिव, बाळकृष्ण जगन्नाथ पाटील गव्हाण विभाग उपाध्यक्ष तसेच प्रितम पंढरीनाथ तांडेल गव्हाण विभाग उपाध्यक्ष या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# साफोर्ड कंपनीतील कामगारांना ११००० रुपयांची पगारवाढ

### महेंद्रशेठ घरत यांच्या न्यू मॅरीटाईम अँड जनरल कामगार संघटनेचा करार

**उरण । विठ्ठल ममताबादे**

कामगारांच्या न्याय हक्कासाठी सदैव तत्पर असलेले राष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगारांचे नेतृत्व करत असतांना स्थानिक भूमिपुत्र कामगारांना सन्मान पूर्वक जगण्यासाठी त्यांना न्याय देण्याचे काम सातत्याने करत असतात संघटनेतर्फे. सन २०२६ मधील हा पाचवा पगारवाढीचा करार २१ एप्रिल रोजी करण्यात आला. तळोजा एम. आय.डी.सी मधील साफोर्ड ली या कंपनीतील कामगारांनी अगोदरच्या दोन संघटनांना राजीनामा देवून कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या नेतृत्वातील न्यू मॅरीटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटनेवर विश्वास ठेवला. या विश्वासाला तडा न जाता संघटनेने कामगारांना तीन वर्षासाठी तब्बल ११००० रुपयांची पगारवाढ करण्याचा करार



केला. या करारनाम्यानुसार कामगारांना एक ग्रॉस सॅलरी पगार, मेडिक्लेम पॉलीसी व इतर सोई सुविधा देण्याचे मान्य करण्यात आले आहे. तब्बल ११००० रुपये पगारवाढ मिळाल्यामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे, कामगारांनी संघटनेचे आभार मानले.

# पनवेल हारींग्राम फॉर्च्युन सिम्फनी केवाळे येथे महामानवांचा सयुक्त जयंती महोत्सव उत्साहात साजरी

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

पनवेल हारींग्राम येथे महामांनवाची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या कार्यक्रमास प्रमुख उपस्तीथी पूज्यभन्ते पूर्ण यांच्या हस्ते - धम्म ध्वज ध्वजारोहन झाले कार्यक्रमाचे अध्यक्ष - आयु. अजमीर काट्रे

सूत्र संचालन -डॅशिंग समाजसेवक प्रसाद जनार्दन कांबळे प्रणभ कांबळे डॉ बाबासाहेब अंबेडकर जयंती निमित्त महीलांन साठी विशेष कार्यक्रमाचे











आयोजन करण्यात आले.त्यामध्ये संगित खुर्ची.गाण्यांची महफील.महीलांनसाठी नवनवीन कार्यक्रम राबवण्यात आले होते. प्रमुख उपस्थिती - दैनिक लोकांकीत संपादक संजय पवार यांना श्री फळ व शॉल देवून मान सन्माणीत करण्यात आले जयतीर्थ सेतूराव, जयप्रकाश तोडाई, आपला सरपंच संपादक चंद्रकांत जगताप, संतोष पाटील, दामू पारधी, अक्षय पाटील, अलंकार पाटील, नरेश गांधले उमंग काट्रे , भूषण खांडेकर, चेतन साळवी, सुबोध साळवी, उत्तम येसणकर, प्रसाद गुडिले, नंदकुमार कांबळे, संतोष कदम, राज कांबळे, अरुण वाघमारे, प्रणभ कांबळे. महिला - नयना कांबळे, माया काट्रे प्रमिला खांडेकर, समता खांडेकर, अपूर्वा काट्रे , कामिनी तोडाई, पूनम कांबळे, प्रियंका कांबळे, चेतना साळवी, अंकिता साळवी, रुपाली पवार, सान्वी सावंत, अनिता वाघमारे, ज्योती येसणकर, अनिता मोरे, नीलम मोरे आदी सर्व उपस्थित असून कार्यक्रमाची रूप रेषा संभोदीत करून वेग वेगळ्या कार्यक्रमाचे आयोजनं केलें होते या कार्यक्रमास शेकडो महिला उपास्तिथ होत्या.

# भाजपला महिला आरक्षणाच्या नावा खाली स्वत:ची पोळी भाजण्याची घाई!

## काँग्रेसच्या सोनललक्ष्मी घाग यांचे मत

**उलवे । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने २०२३ मध्ये महिला आरक्षण विधेयक संसदेत मंजूर केलेले असतानाही त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. त्याऐवजी २०२६ मध्ये पुन्हा महिला आरक्षणाच्या आडून (डेलिमिटेशन) परिसीमन विधेयक संसदेत आणण्याचा प्रयत्न करण्यात येत असून ही संविधान विरोधी कृती आहे. महिला आरक्षणाच्या नावाखाली भाजपला स्वत:ची पोळी भाजण्याची घाई झाली आहे. वास्तविक पहिल्यांदा जातीनिहाय जनगणना करणे आवश्यक आहे; परंतु केंद्र सरकार तसे करत नाही. त्यामुळे भाजप सरकारची जनतेला दिशाभूल करण्याची ही खेळी आहे. हे केवळ महिला आरक्षण विधेयक नाही, तर देशाच्या लोकशाही ढाच्यात बदल करण्याचा प्रयत्न आहे.




भारतीय संविधानावर आक्रमण करण्याचा प्रकार आहे. त्यामुळे जनतेची दिशाभूल करणाऱ्या विधेयकाला काँग्रेस पक्ष कधीही साथ देणार नाही, ते कायम हाणून पाडेल, असे रत्नागिरी उत्तर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा सोनललक्ष्मी घाग यांनी बुधवारी (ता. २२) उलवे येथील काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात पत्रकार परिषदेत सांगितले. काँग्रेसने नेहमीच महिलांना सत्तेत आणि पक्षातही प्राधान्य दिले आहे. सरोजिनी नायडू, इंदिरा गांधी, प्रतिभाताई पाटील, सोनिया गांधी अशा असंख्य महिलांना काँग्रेसने संधी दिलेली आहे. थोडक्यात काँग्रेसने नेहमीच महिलांना सत्तेत आणि पक्षातही प्राधान्य दिले आहे, असेही सोनललक्ष्मी घाग यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे देताना सांगितले. या पत्रकार परिषदेला काँग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर उपस्थित होते. महिला आरक्षण विधेयकाची वस्तुस्थिती नेमकी काय आहे. केंद्र सरकार कशा पद्धतीने जनतेची फसवणूक करीत आहे. हे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी पत्रकार परिषद आयोजित केली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उरण तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, अखलाख शिलोत्री, महिला जिल्हाध्यक्षा रेखा घरत, निर्मलाताई पाटील, विनया पाटील, सारिका पाटील, योगिता नाईक आदी महिला कार्यकर्त्याही उपस्थित होत्या.

# छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती उत्साहात साजरी

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

वाशी येथील एपीएमसी मार्केट मधील फ्रुट मार्केट या ठिकाणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट व रिपब्लिकन सुरक्षा रक्षक माथाडी आणि जनरल कामगार युनियन यांच्या वतीने दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी एपीएमसी फ्रुट मार्केटमध्ये या महापुरुषांचा जयंती उत्सव साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे आयोजक फैयाज भाई शेख अध्यक्ष माथाडी कामगार बेलापूर विधानसभा यांनी केले होते या जयंती सोहळ्यामध्ये एकात्मता व सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष व नवी मुंबई निरीक्षक आर .पी .आय .आठवले गटाचे सिद्रामजी ओव्हाळ साहेब उपस्थित



होते त्यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करतांना म्हणाले की संविधान हे सत्याचा मार्ग आहे संविधानाचा सन्मान करावा सर्व जाती धर्मातील नागरिकांनी आपली जबाबदारी ओळखून संविधाना प्रमाणे आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे आपणाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या मार्फत जगण्याचा राहण्याचा खाण्या पिण्याचा अधिकार दिलेला आहे असे वक्तव्य केले

यावेळी उपस्थित यशपाल ओव्हाळ नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सदस्य युवक जिल्हा अध्यक्ष नवी मुंबई आर .पी.आय यांच्या सह नगरसेविका शुभांगी ताई पाटील नगरसेवक राजेश शिंदे नवी मुंबई परिवहन सदस्य विनोद पाटील . नवी मुंबई महिला जिल्हाध्यक्षा शिलाताई बोदडे .नवी मुंबई माथाडी अध्यक्ष .बाळू गायकवाड नवी मुंबई वाहतूक अध्यक्ष इम्रान शेख. ब्रदर्स ग्रुपचे गजानन म्हात्रे दादा. बारीक भाई शेख . शौकत भाई शेख . अलम भाई कुरेशी. पठाण कंपनीचे ईमराण भाई खान . अज्जू भाई . नवी मुंबई उपाध्यक्ष युवकचे जय भालेराव . यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते .



**ठाणे : दिवा स्टेशन पूर्वेला पुन्हा फेरीवाल्यांचा ताबा. न्यायालयाच्या आदेशाला केराची टोपली दाखवण्यात आल्याचे स्पष्ट चित्र दिसू लागले आहे. रेल्वे स्टेशन परिसरात १५० मीटरवर फेरीवाल्यांवर कडक निर्बंध टाकले असताना दिवा स्टेशन पूर्वेला ना फेरीवाला क्षेत्र असताना ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडुन पूर्णत: डोळेझाक केलेली पहावयास मिळत आहे. (फोटो – संतोष पडवळ )**

# दिग्गज कलाकारांच्या उपस्थितीत 'पंख होते तो उड जाते'चा ट्रेलर लॉन्च

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईत आगामी हिंदी चित्रपट *पंख होते तो उड जाते*चा ट्रेलर आणि म्युझिक लॉन्च अत्यंत ग्लॅमरस आणि हाय-प्रोफाइल सोहळ्यात पार पडला. यूएसए-स्थित निर्माता डरा झरींशश्र निर्मित या चित्रपटाचे संगीत रेड रिबन म्यूजिक यांच्या माध्यमातून रिलीज करण्यात आले.

अंधेरी वेस्ट येथील येथे आयोजित या खास कार्यक्रमाला पद्मश्री सन्मानित गायक अनूप जलोटा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले दिग्गज कलाकार सुदेश बेरी शहबाज़ ख़ान आणि अवतार गिल - ज्यांच्या प्रभावी अभिनयामुळे चित्रपटाबद्दलची उत्सुकता अधिकच वाढली आहे. याशिवाय गौरी शंकर, अरमान आणि निशांत यांनीही माध्यमांशी संवाद साधत चित्रपटाच्या अनुभवांबद्दल




माहिती दिली.

कार्यक्रमात प्रदर्शित करण्यात आलेल्या ट्रेलरने आपल्या सस्पेन्स आणि थ्रिलने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. रहस्यमय कथा, इंटेन्स सीन आणि अनपेक्षित ट्विस्टमुळे हा चित्रपट प्रेक्षकांना खिळवून ठेवेल, अशी चर्चा रंगली.

चित्रपटाचे संगीत अधिकृतपणे रेड रिबन म्युझिकद्वारे लॉन्च करण्यात आले. यावेळी रेड रिबन म्युझिकच्या संस्थापक लालित्य मुंशा यांनी सांगितले की, या चित्रपटातील गाणी ताजी, कॅची आणि सहज गुणगुणता येतील अशी आहेत. बिजली हूं मैं आणि नज़रों ने तेरी मुझसे ही गाणी विशेष लक्षवेधी ठरत आहेत.

या चित्रपटाचे दिग्दर्शन दिवंगत चित्रपट निर्माते शिवा त्रिपाठी यांनी केले आहे, ज्यामुळे हा प्रकल्प संपूर्ण टीमसाठी भावनिकदृष्ट्या अत्यंत खास ठरतो. कार्यक्रमादरम्यान सॅम पटेल आणि संपूर्ण टीमने शिवा त्रिपाठी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.यावेळी सॅम पटेल म्हणाले,पंख होते तो उड जाते हा फक्त एक चित्रपट नाही, तर एक स्वप्न आहे. शिवा त्रिपाठी यांच्या दृष्टीकोन आणि जिद्दीचा हा परिणाम आहे. आम्हाला खात्री आहे की प्रेक्षक या चित्रपटाच्या सस्पेन्स आणि भावनांशी नक्की जोडले जातील.

ट्रेलरला उपस्थित मीडिया आणि पाहुण्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे।

पंख होते तो उड जाते हा चित्रपट १ मे २०२६ रोजी देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार असून, सस्पेन्स, थ्रिल आणि दमदार कलाकारांच्या जोरावर प्रेक्षकांना एक वेगळा सिनेमॅटिक अनुभव देण्यासाठी सज्ज आहे.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५